# प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, हिंगणा यांचे न्यायालयात

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ५१२/२०२६**

**निशाणी क्रमांक ०३**

## आरोपीचे प्रतिकथन

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | गुन्हा घडलयाचा दिनांक | :- | २९/१२/२०२५ |
| (२) | तक्रार दिल्याचा दिनांक | :- | २९/१२/२०२५ |
| (३) | तक्रारदादराचे नांव | :- | महाराष्ट्र शासन मार्फत,पोलीस ठाणे अधिकारी,<br>पोलीस ठाणे हिंगणा |
| (४) | आरोपीचे नाव | :- | २) ज्ञानेश्वर हिरामन हुलके, वय -४२ वर्ष,<br>३) शंकर उर्फ सतीश नामदेव आष्टनकर, वय -४३ वर्ष,<br>४) दिनेश रुपचंद साठवणे, वय-३२ वर्ष,<br>६) जगदीश नागोराव भुसारी, वय -५० वर्ष,<br>७) हर्षल रविंद्र बोरकर, वय-२४ वर्ष,<br>८) जयवंत उर्फ बापू भोलाराम देशमुख, वय-३१ वर्ष,<br>सर्व आरोपी राहणारः- जुना गुमगाव, तह-हिंगणा, जिल्हा-नागपुर. |
| (५) | गुन्हयाचा तपशील | :- | |

वर नमुद दिवशी व वेळी मौजा दुर्वास बोरकर यांच्या शेताजवळील नाल्याजवळ, गूमगाव, तह-हिंगणा, जिल्हा-नागपुर येथे तुम्ही आरोपींनी स्वतःच्या फायद्यासाठी सार्वजनिक ठिकाणी सट्टा जूगाराचा खेळ खेळतांना व खेळवितांना मिळुन आलांत आणि त्यायोगे तुम्ही कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा केला आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| (६) | | | **आरोपीची जबानी (Plea).** |
| **प्रश्न** | (१) | :- | तुम्हाला दाखल केलेल्या प्रकरणात दाखल कागदपत्रांच्या नकला मिळाल्या काय? |
| **उत्तर** | | :- | होय. |
| **प्रश्न** | (२) | :- | तुमच्यावर ठेवण्यात आलेला आरोप तूम्हाला समजावून सांगीतला, तो तूम्हाला समजला काय? |
| **उत्तर** | | :- | होय. |
| **प्रश्न** | (३) | :- | तुम्हाला गुन्हा कबूल आहे का? |
| **उत्तर** | | :- | होय, मला गुन्हा कबूल आहे व मी तशी पूरसीस नि.क्र.०२ वर दाखल केली आहे. |

२)स्वाक्षरीत........................३)स्वाक्षरीत........................४)स्वाक्षरीत........................

६)स्वाक्षरीत........................७)स्वाक्षरीत........................८)स्वाक्षरीत........................

आरोपींची सही

VISHAL HARIBHAU KHEDKAR
Digitally signed by VISHAL HARIBHAU KHEDKAR
Date: 2026.03.14 15:03:24 +0530

दिनांकः- १४/०३/२०२६

(व्ही.एच.खेडकर,)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, हिंगणा

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ५१२/२०२६**

**सरकार विरुद्ध स्वप्नील राऊत**

आरोपी हे आज रोजी न्यायालयात हजर झाले आहेत. आरोपी स्वेच्छेने गुन्हा कबुल करत असल्याबाबत न्यायालयात सांगितले. आरोपीच्याविरुद्ध **महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२(अ)** अन्वये प्रकरण दाखल आहे. त्यांनी गुन्हा कबुल केल्यामुळे होणाऱ्या परिणामांची कल्पना त्याला देण्यात आली. तरीही आरोपी हे गुन्हा कबुल करीत आहे. यावरुन हे स्पष्ट होते की, आरोपी यांनी स्वेच्छेने गुन्हा कबुल व मान्य केला आहे.

२) शिक्षेविषयी आरोपी व सरकारी वकीलांचे म्हणणे ऐकले. आरोपी यांनी सांगितले की, ते सराईत गुन्हेगार नाही. हा त्यांचा प्रथम गुन्हा आहे आणि सदर गुन्हयासाठी त्यांना पश्चाताप होत आहे, त्यामुळे त्यांना कमीत कमी शिक्षा दयावी अशी विनंती केली आहे. आरोपी यांना सदर गुन्हयाचा पश्चाताप झालेला आहे आणि त्यांनी स्वतःहुन प्रामाणिकपणे गुन्हयाची कबुली दिली आहे. या सर्व कारणांचा विचार करता मी खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे.

**–::: आ दे श ::–**

१) आरोपींना **फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२** अन्वये **महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२(अ)** प्रमाणे गुन्हयासाठी दोषी ठरवुन त्यांना न्यायालय उठे पर्यंत शिक्षा व प्रत्येकी रक्कम रुपये ३००/– (अक्षरी तीनशे फक्त) दंड द्रव्याची शिक्षा सुनावण्यात येत आहे व सदरची दंड द्रव्याची रक्कम न भरल्यास प्रत्येकी दोन दिवस साधी कैद अशी शिक्षा सुनावण्यात येत आहे.

२) जप्त मुद्देमाल इतर आरोपींविरुद्ध संपरिक्षेकरीता जतन करण्यात यावा.

VISHAL HARIBHAU KHEDKAR

Digitally signed by VISHAL HARIBHAU KHEDKAR
Date: 2026.03.14 15:03:30 +0530

दिनांकः–१४/०३/२०२६

(व्ही. एच. खेडकर)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, हिंगणा